४

# घटनादुरुस्ती : व्याप्ती आणि मर्यादा

Constitutional Amendments: Scope and Limitations

*अ) घटनादुरुस्तीच्या तरतूदी ब) प्रमुख घटनादुरुस्त्या (४२ वी, ४४ वी आणि ८६ वी) क) भारतीय राज्यघटनेची मूलभूत चौकट; विविध महत्त्वपूर्ण खटले*

राज्यघटना हा देशाचा मूलभूत कायदा मानला जातो. अर्थात कोणत्याही राष्ट्राची राज्यघटना ही शाश्वत, कायमस्वरूपी असू शकत नाही. बदलत्या काळानुरूप त्यात आवश्यक ते बदल करणे हे सामाजिक, राजकीय व आर्थिकदृष्ट्या जिवंतपणाचे लक्षण ठरते. राज्यघटना परिवर्तनीय असेल तर त्यात वारंवार बदल होऊन तीचे महत्व कमी होते तर घटना परिदृढ असेल तर बदलत्या परिस्थितीनुरूप त्यात बदल न झाल्याने समाजाकडून त्याविरूद्ध उठाव होण्याची शक्यता असते. याचसाठी राज्यघटना अंशत: परिदृढ व अंशत: परिवर्तनीय स्वरूपाची स्विकारून भारताने या आव्हानावर मात केली आहे.

या प्रकरणात आपण भारतीय राज्यघटनेतील घटनादुरुस्तीची पद्धती, महत्वाच्या घटनादुरुस्त्या व घटनेची मुलभूत चौकट याविषयी सविस्तर अभ्यास करणार आहोत.

## अ) घटनादुरुस्तीच्या तरतूदी

### घटनादुरुस्तीची व्याप्ती व मर्यादा

राज्यघटना हा देशाचा मुलभूत कायदा असतो. अर्थात कोणत्याही देशाची राज्यघटना अपरिवर्तनीय असू शकत नाही. प्रत्येक राज्यघटनेत काळानुरुप काही बदल करावेच लागतात. कोणतीही लिखित राज्यघटना एका विशिष्ठ कालावधीत तयार केलेली असते त्यामुळे त्या घटनेतील काही तरतुदी बदलत्या राजकीय व सामाजिक परिस्थितीत कालबाह्य ठरत असतात. तेव्हा अशा कालबाह्य तरतुदी

बदलणे देशाच्या आणि समाजाच्या हिताच्या दृष्टीने आवश्यक असते. भारतीय घटनाकारांनीही यादृष्टीने राज्यघटनेत घटनादुरुस्तीच्या तरतुदी समाविष्ठ करून घटनाविकासाचा मार्ग प्रशस्त केलेला आहे.

घटनादुरुस्तीची आवश्यकता व महत्व स्पष्ट करतांना पंडीत जवाहरलाल नेहरू यांनी ८ नोव्हेंबर १९४८ रोजी घटनापरिषदेतील भाषणात घटनादुरुस्तीविषयी मत मांडतांना म्हटले की, ''भारतीय जनतेची अशी अपेक्षा आहे की, आपण जी घटना निर्माण करणार आहोत ती मजबूत व टिकाऊ स्वरूपाची असावी परंतु जगातील कोणतीही घटना कायमस्वरूपी असू शकत नाही. जग झपाट्याने बदलत आहे आणि आपण जे ठरवू ते भविष्यकाळात योग्य ठरेलच असे नाही म्हणून आपली घटना परिवर्तनीय असली पाहिजे.'' के.सी.व्हिअर यांच्या मते, ''भारतीय घटनेने परिदृढता आणि परिवर्तनीय यांच्या वास्तववादी आणि व्यवहार्य समन्वय साधण्याचा प्रयत्न केलेला आहे.'' ग्रॅनव्हिल ऑस्टीन यांच्या मते, ''घटनादुरूस्ती प्रक्रिया ही राज्यघटनेची सक्षम, परिपूर्ण बाजू आहे. ती गुंतागुंतीची वाटत असली तरी ती बाजू केवळ भिन्न बाब आहे.''

राज्यघटना परिवर्तनीय असेल तर त्यात वारंवार बदल झाल्याने तिचे महत्व कमी होते तर घटना परिदृढ असेल तर बदलत्या परिस्थितीनुरूप त्यात बदल न झाल्याने समाजाकडून त्याविरूद्ध उठाव होण्याची शक्यता असते. भारतीय राज्यघटनेचे हे आगळे-वेगळे वैशिष्ट्य आहे की, भारतीय राज्यघटना ही अंशत: परिदृढ व अंशत: परिवर्तनीय स्वरूपाची आहे. भारतीय राज्यघटनेत दुरुस्तीविषयक तीन पद्धतींचा स्वीकार केला आहे. संसदेच्या साध्या बहुमताने केल्या जाणाऱ्या घटनादुरुस्त्या, संसदेच्या विशेष बहुमताने केल्या जाणाऱ्या घटनादुरुस्त्या आणि संसदेच्या विशेष बहुमताबरोबरच निम्म्याहून अधिक घटकराज्यांच्या विधिमंडळाच्या संमतीने केल्या जाणाऱ्या घटनादुरुस्त्या अशा तीन पद्धतींचे विश्लेषण घटनेत करण्यात आले आहे.

भारतीय राज्यघटनेच्या कलम ३६८ मध्ये घटनादुरुस्तीची तरतूद करण्यात आली असून पुढील काही महत्वाच्या मर्यादा त्यासंदर्भात स्पष्ट केल्या आहेत.

» राज्यघटनेमध्ये दुरुस्ती करण्याचा घटनात्मक अधिकार संसदेकडे असून केवळ काही विषयांच्या बाबतीत मर्यादित स्वरूपातील असा अधिकार घटक राज्यातील विधीमंडळाकडे आहे. अर्थात एखादे विधेयक घटक राज्यांच्या विधीमंडळाकडे पाठविल्यास ते त्यांनी किती कालावधीत परत करावे, यासंबंधी घटनेत स्पष्ट उल्लेख नाही.
» घटनादुरुस्ती विधेयकाबाबत लोकसभा व राज्यसभा यात मतभेद

निर्माण झाल्यास संयुक्त बैठकीची तरतूद केलेली नाही.

» १९७१ च्या २४ व्या घटनादुरुस्तीनुसार संसदेने संमत केलेल्या घटनादुरुस्ती विधेयकास राष्ट्रपतींना नकाराधिकार वापरता येत नाही.

» केशवानंद भारती विरूद्ध केरळ राज्य खटला (१९७३) व मिनर्व्हा मिल्स विरूद्ध भारतीय संघराज्य खटला (१९८०) या खटल्यातील निर्णयानुसार भारतीय संसदेला राज्यघटनेतील ३६८ व्या कलमातील घटनादुरुस्तीच्या पद्धतीने घटनेच्या कोणत्याही भागात बदल करण्याचा अधिकार असला तरी घटनेच्या मुलभूत चौकटीत बदल करता येणार नाही ही मर्यादा स्पष्ट केली आहे.

सद्यस्थितीत भारतीय राज्यघटनेत १२४ घटनादुरुस्त्या झाल्या असून राज्यघटनेला कालानुरुप ठेवण्याचा त्याद्वारे प्रयत्न करण्यात आला आहे.

**घटनादुरुस्तीच्या तरतुदी/पद्धती**

भारतीय राज्यघटनेच्या २० व्या भागात कलम ३६८ मध्ये घटनादुरुस्तीच्या तरतुदी दिल्या असून त्यासाठी पुढील तीन पद्धतींचा स्वीकार करण्यात आला आहे.

**१) संसदेच्या साध्या बहुमताने घटनादुरुस्ती**

संसदेच्या दोन्हीही गृहात उपस्थित असलेल्या सदस्यांच्या साध्या बहुमताने घटनादुरुस्ती विधेयक मंजूर केले आणि त्यास राष्ट्रपतींची संमती मिळाली असता ती घटनादुरुस्ती होऊ शकते.

साधारणत: साध्या बहुमताने पुढील विषयासंदर्भात घटनादुरुस्ती करता येते.

» नवीन घटकराज्य निर्माण करणे

» घटक राज्यांची सीमा बदलणे

» घटकराज्यांचे नाव बदलणे

» घटकराज्याच्या विनंतीवरून त्या घटकराज्यात विधानपरिषदेची निर्मिती करणे अथवा तेथील विधानपरिषद बरखास्त करणे.

» नागरिकत्वाच्या अटीसंबंधीचे बदल करणे.

» घटकराज्यातील लोकसभेच्या जागांची फेरवाटणी करणे.

» अनुसूचित जाती-जमातीचे प्रशासन

**२) संसदेच्या विशेष बहुमताने घटनादुरुस्ती**

घटनादुरुस्ती विधेयक संसदेच्या कोणत्याही सभागृहात प्रथम मांडता येते. हे दुरुस्ती विधेयक दोन्हीही सभागृहात एकूण सदस्यांच्या बहुमताने आणि उपस्थित राहून मतदान करणाऱ्या सदस्यांच्या २/३ बहुमताने मंजूर व्हावे लागते. अशा प्रकारे

मंजूर झालेल्या विधेयकाला राष्ट्रपतींनी संमती दिल्यास घटनादुरुस्ती होते.

भारतीय राज्यघटनेच्या कलम ५४, ५५, ७३, १६२ व २४१ इत्यादी कलमात दुरुस्ती करण्यासाठी या पद्धतीचा वापर करण्यात आला आहे.

**३) संसदेच्या विशेष बहुमताबरोबरच निम्म्यापेक्षा अधिक घटकराज्यांच्या विधानसभांच्या संमतीने**

काही विषयासंदर्भात घटनादुरुस्ती करतांना संसदेच्या दोन्हीही सभागृहात एकूण सदस्यांच्या बहुमताने आणि उपस्थित राहून मतदान करणाऱ्या सदस्यांच्या २/३ बहुमताने मंजूर करून ते विधेयक घटक राज्यांच्या विधानसभांच्या मंजुरीसाठी पाठविले जाते. यावेळी निम्म्यापेक्षा अधिक घटकराज्यातील विधानसभांनी त्याला मान्यता दिल्यास राष्ट्रपतींच्या संमतीने ती घटनादुरुस्ती केली जाते.

या पद्धतीने पुढील विषयासंदर्भात घटनादुरुस्ती करण्यात येते.

- » राष्ट्रपतींच्या निवडणुकीची पद्धत
- » केंद्र सरकार आणि घटक राज्य सरकार यांच्या अधिकार क्षेत्राबद्दलच्या तरतुदी
- » केंद्रशासित प्रदेशासाठी असणाऱ्या उच्च न्यायालयाची व्यवस्था
- » संसदेमध्ये असणारे घटकराज्याचे प्रतिनिधीत्व
- » घटनादुरुस्तीच्या पद्धतीमधील तरतुदी

**ब) प्रमुख घटनादुरुस्त्या (४२ वी, ४४ वी आणि ८६ वी)**

**१) ४२ वी घटनादुरुस्ती (१९७६)**

१९७६ साली ४२ वी घटनादुरुस्ती करण्यात आली. ही घटनादुरुस्ती अत्यंत विस्तृत होती. या घटनादुरुस्तीने घटनेचा सरनामा, घटनेतील इतर ४० कलमे व ७ वे परिशिष्ट यात दुरुस्त्या करून नवीन १४ कलमे घटनेत समाविष्ठ करण्यात आली. त्यामुळे या घटनादुरुस्तीला विशेष महत्व प्राप्त झालेले आहे. अर्थात आणिबाणीच्या कालखंडात ही घटनादुरुस्ती झाल्याने मोठ्या प्रमाणात ती वादग्रस्त ठरली. यातील घटनात्मक बदल पुढीलप्रमाणे –

| प्रमुख घटनादुरुस्त्या |
|---|
| » ४२ वी घटनादुरुस्ती (१९७६) |
| » ४४ वी घटनादुरुस्ती (१९७८) |
| » ८६ वी घटनादुरुस्ती (२००२) |

- (1) » या घटनादुरुस्तीने भारतीय राज्यघटनेच्या सरनाम्यात समाजवादी व धर्मनिरपेक्ष शब्द समाविष्ठ केले. त्यामुळे सार्वभौम, समाजवादी, धर्मनिरपेक्ष लोकशाही गणराज्य असा

बदल झाला तर राष्ट्राची एकता या ऐवजी राष्ट्राचे ऐक्य व एकात्मता असा बदल करण्यात आला.

» घटनेच्या कलम ३१ (क) ची व्याप्ती वाढविण्यात आली. यानुसार मार्गदर्शक तत्वांची अंमलबजावणी करतांना मूलभूत हक्कांचा भंग होतो. या कारणावरून कोणत्याही न्यायालयात दाद मागता येणार नाही.

» कलम ३१ (ड) हे कलम नव्याने समाविष्ठ करण्यात आले त्यानुसार राष्ट्रविरोधी कृत्यांचा तसेच त्यासाठी स्थापन होणाऱ्या संघटनांवर प्रतिबंध करणारा कायदा संसदेला करता येईल. तसेच तो कायदा मूलभूत कायद्यांशी विसंगत आहे या कारणास्तव रद्द ठरविता येणार नाही अशी तरतूद करण्यात आली.

» या घटनादुरुस्तीनुसार घटनेत ४ (अ) हा नवा भाग आणि त्यात ५१ (अ) हे नवे कलम समाविष्ठ करून दहा मूलभूत कर्तव्यांचा समावेश करण्यात आला.

» घटनादुरुस्तीने कलम ७४ नुसार पंतप्रधान व त्याच्या मंत्रिमंडळाने दिलेला सल्ला राष्ट्रपतींवर बंधनकारक करण्यात आला.

» तसेच कलम ८३ आणि कलम १७२ मध्ये दुरुस्ती करून लोकसभा

### ४२ वी घटना दुरुस्ती

१९७६ साली ४२ वी घटनादुरुस्ती करण्यात आली. ४० कलमे व ७ वे परिशिष्ट यात दुरुस्त्या करून नवीन १४ कलमे घटनेत समाविष्ठ करण्यात आली. आणिबाणीच्या कालखंडात ही घटनादुरुस्ती झाल्याने वादग्रस्त ठरली. सरनाम्यात समाजवादी व धर्मनिरपेक्ष शब्द समाविष्ठ केले. त्यामुळे सार्वभौम, समाजवादी, धर्मनिरपेक्ष लोकशाही गणराज्य असा बदल झाला घटनेच्या कलम ३१ (क) ची व्याप्ती वाढविण्यात आली. कलम ३१ (ड) हे कलम नव्याने समाविष्ट करण्यात आले. ४ (अ) हा नवा भाग आणि त्यात ५१ (अ) हे नवे कलम समाविष्ठ करून दहा मूलभूत कर्तव्यांचा समावेश करण्यात आला. पंतप्रधान व त्याच्या मंत्रिमंडळाने दिलेला सल्ला राष्ट्रपतींवर बंधनकारक. लोकसभा आणि विधानसभेच्या कार्यकाळ पाच वरून सहा वर्षे. राज्यातील आणिबाणीची मुदत दर सहा महिन्याऐवजी एका वर्षाने वाढविण्याची तरतूद. केंद्र सरकारच्या कायद्याची वैधता तपासण्याचा अधिकार केवळ सर्वोच्च न्यायालयाला तर घटकराज्याच्या कायद्यांची वैधता तपासण्याचा अधिकार उच्च न्यायालयाला देण्यात आला.

आणि विधानसभेच्या कार्यकाळ पाच वरून सहा वर्षे करण्यात आला.

» घटनादुरुस्तीने राज्यघटनेत कलम २५७ (अ) नव्याने समाविष्ठ करून त्यानुसार घटक राज्यात कायदा व सुव्यवस्थेची गंभीर परिस्थिती निर्माण झाल्यास केंद्र आपले सशस्त्र दल त्या राज्यात पाठवू शकेल तसेच असे दल केंद्राच्या नियंत्रणाखाली काम करेल.

» या घटनादुरुस्तीने आणिबाणीविषयक तरतुदींमध्ये बदल करून आणिबाणी देशाच्या विशिष्ट भागापुरती लागू करण्याचा अधिकार राष्ट्रपतींना देण्यात आला तसेच राज्यातील आणिबाणीची मुदत दर सहा महिन्याऐवजी एका वर्षाने वाढविण्याची तरतूद करण्यात आली.

» केंद्र सरकारच्या कायद्याची वैधता तपासण्याचा अधिकार केवळ सर्वोच्च न्यायालयाला प्रदान करण्यात आला तर घटकराज्याच्या कायद्यांची वैधता तपासण्याचा अधिकार उच्च न्यायालयाला देण्यात आला.

» या घटनादुरुस्तीने कलम ३६८ नुसार संसदेच्या घटनादुरुस्तीच्या अधिकारावर कसलेही निर्बंध ठेवले नाही तसेच न्यायालयात त्याला आव्हान देता येणार नाही असा बदल करण्यात आला.

» संसदेच्या दोन्ही सभागृहातील गणसंख्येबाबत तसेच संसद सदस्यांचे विशेषाधिकार इत्यादी बाबत योग्य तो निर्णय घेण्याचा अधिकार संसदेला देण्याचा महत्वपूर्ण बदल या घटनादुरुस्तीने केला.

**२) ४४ वी घटनादुरुस्ती (१९७८)**

४२ व्या घटनादुरुस्तीने घटनात्मकदृष्ट्या निर्माण केलेल्या प्रश्नांवरील एक उपाय म्हणून ४४ वी घटनादुरुस्ती १९७८ साली करण्यात आली. घटनात्मक मुल्यांची पुर्नस्थापना करण्याचे तथा घटना पुन्हा तिच्या मूळ स्वरूपात आणण्याचे काम ४४ व्या घटनादुरुस्तीने शक्य झाले.

» मालमत्तेचा हक्क मुलभूत हक्कांमधून वगळून त्याला वैधानिक हक्क म्हणून घटनेत कलम ३०० (अ) मध्ये समाविष्ठ केले.

» लोकसभा व विधानसभांची मुदत सहा वर्षावरून पुन्हा पाच वर्षांवर आणण्यात आली.

» सर्वोच्च न्यायालयाच्या अधिकारांवर ४२ व्या घटनादुरुस्तीने जी बंधने लादली होती ती काढून टाकण्यात आली.

» अंतर्गत आणिबाणी जाहीर करण्याच्या शासनाच्या अधिकारांवर निर्बंध घालण्यात आले.

» उच्च न्यायालयासमोर सुरू असलेला खटला स्वत:कडे घेण्याचा अधिकार सर्वोच्च न्यायालयाला बहाल करण्यात आला.

» कलम ३६१ (अ) चा नव्याने समावेश करून वृत्तपत्रांना विशेष संरक्षण देण्यात आले.

» कलम ३५६ मध्ये ४२ व्या घटनादुरुस्तीने केलेला बदल रद्द करून घटक राज्यात आणिबाणी जाहीर झाल्यानंतर सहा महिन्याच्या आत संसदेची मान्यता घेण्याची पूर्वीची अट लागू करण्यात आली.

**३) ८६ वी घटनादुरुस्ती (२००२):**

८६ वी घटनादुरुस्ती लहान मुलांच्या शिक्षणाच्या हक्काशी संबंधीत असून १२ डिसेंबर २००२ रोजी या घटनादुरुस्तीला मंजुरी देण्यात आली. यानुसार राज्यघटनेत कलम २१ (अ) या नव्या कलमाचा समावेश करून सहा ते चौदा वयोगटातील मुला-मुलींसाठी मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा मूलभूत हक्क प्रदान करण्यात आला.

राज्यघटनेत कलम ४५ मध्ये बालकांचे वय सहा वर्षाचे होईपर्यंत त्याचे संगोपन व शिक्षणाची व्यवस्था करण्याची तरतूद राज्याने करावी हे मार्गदर्शक तत्व होते. तसेच कलम ५१ (अ) मधील 'ट' मध्ये पालकांनी आपल्या पाल्यास त्याच्या वयाच्या सहाव्या वर्षापासून ते चौदा वर्षापर्यंत शिक्षणाची संधी उपलब्ध करून द्यावी हे कर्तव्य समाविष्ठ असून त्याशी निगडीत हा मूलभूत हक्क देण्यात आला आहे. भारतात सामाजिक व आर्थिक समस्यांमुळे लहान मुलांच्या शिक्षणाविषयीची अनास्था, बालकामगारांचा प्रश्न, लहान बालकांच्या अनारोग्याचे प्रश्न निर्माण झालेले दिसतात. त्यावरील उपाययोजनेसाठी 'शिक्षणाचा हक्क' एक उपयुक्त पाऊल मानले गेले आहे.

## क) भारतीय राज्यघटनेची मूलभूत चौकट

सन १९७३ मधील केशवानंद भारती विरूद्ध केरळ राज्य या खटल्यातील निर्णयात सर्वप्रथम सर्वोच्च न्यायालयाने 'राज्यघटनेची मूलभूत चौकट' या संज्ञेचा वापर केला. या खटल्याच्या निर्णयात हे स्पष्ट करण्यात आले. घटनेतील मूलभूत हक्कांसह घटनेच्या कोणत्याही भागात संसदेला घटनादुरुस्ती करता येईल मात्र त्याद्वारे राज्यघटनेच्या मूलभूत चौकटीत बदल करता येणार नाही अथवा त्यात फेरफार करता येणार नाही.

या निर्णयाने राज्यघटनेच्या मूलभूत चौकटीविषयी विविध तत्वे स्पष्ट केली असली तरी 'राज्यघटनेची मूलभूत चौकट' अशी स्वतंत्र मांडणी घटनेत कोठेही नसून न्यायालयाच्या निर्णयातून घटनेच्या मूलभूत चौकटीतील महत्वपूर्ण तत्वे

घटनेतील तरतुदीतून स्पष्ट करण्याचा प्रयत्न झाला आहे. घटनेची मूलभूत चौकट संज्ञा निर्माण होण्यातील महत्वपूर्ण खटले पुढीलप्रमाणे -

**१) पहिली घटनादुरुस्ती (१९५१)**

संसदेने बिहार, मध्यप्रदेश आणि उत्तर प्रदेश या घटक राज्यांनी केलेल्या जमीन सुधारणा कायद्यांना संरक्षण देण्यासाठी पहिली घटनादुरुस्ती १९५१ साली केली. यानुसार राज्यघटनेत कलम '३१-अ' व कलम '३१-ब' ही दोन कलमे समाविष्ठ करण्यात आली.

» **कलम ३१ (अ) :** नुसार राज्याने एखाद्या व्यक्तीची मालमत्ता ताब्यात घेतल्यास, विभाग तीन मधील कोणत्याही हक्काचा संकोच होतो असे मानून न्यायालयात जाण्यास प्रतिबंध करण्यात आला.

» **कलम ३१ (ब) :** नुसार काही नवीन कायदे व नियम तयार करून ९ व्या परिशिष्ठात समाविष्ठ करण्यात आले तसेच हे परिशिष्ठ न्यायालयीन पुनर्विलोकनापासून संरक्षित करण्यात आले.

**२) शंकरी प्रसाद विरूद्ध भारतीय संघराज्य खटला (१९५१)**

या खटल्यात पहिल्या घटनादुरुस्तीना आव्हान देण्यात आले. त्याविरूद्ध निर्णय देतांना सर्वोच्च न्यायालयाने संसदेला मूलभूत हक्कांमध्ये कलम ३६८ नुसार दुरुस्ती करण्याचा अधिकार मान्य केला.

**३) कलम १३**

शंकरी प्रसाद विरूद्ध भारतीय संघराज्य या खटल्यात निर्णय देतांना कलम १३(२) चा आधार घेण्यात आला. सर्वोच्च न्यायालयाच्या म्हणण्यानुसार कलम १३(२) मधील 'कायदा'च्या व्याख्येत केवळ संसदीय कायद्याच समाविष्ट होतो. घटनादुरुस्ती अंतर्भूत होत नाही. याचाच अर्थ संसद मूलभूत हक्कांना घटनादुरुस्तीद्वारे बदल करू शकते असा निर्णय देण्यात आला.

**४) गोपालनाथ विरूद्ध पंजाब राज्य खटला (१९६७)**

या खटल्यात पहिली, चौथी आणि सतरावी या घटनादुरुस्त्या मूलभूत हक्कांचा संकोच करतात असा युक्तिवाद करून त्यास आव्हान दिले गेले. या विरूद्ध सर्वोच्च न्यायालयाने निर्णय देतांना पूर्वीच्या निर्णयात

**राज्यघटनेची मूलभूत चौकट**

» पहिली घटनादुरुस्ती (१९५१) a) कलम ३१ (अ) b) कलम ३१ (ब)
» शंकरी प्रसाद विरूद्ध भारतीय संघराज्य खटला (१९५१)
» कलम १३
» गोपालनाथ विरूद्ध पंजाब राज्य खटला (१९६७)
» २४ वी घटनादुरुस्ती (१९७१)
» २९ वी घटनादुरुस्ती
» केशवानंद भारती विरूद्ध केरळ राज्य खटला (१९७३)

बदल करून संसदेला मूलभूत हक्कांच्या प्रकरणात दुरुस्ती करण्याचा अधिकार नाही असा न्याय निवाडा करून तो अधिकारच संसदेकडून काढून घेतला. यासाठी पुढील स्पष्टीकरण देण्यात आले.

कलम १३ (२) नुसार राज्याला मूलभूत अधिकाराचा संकोच करणारा कायदा करता येणार नाही अशी तरतूद असून सर्वोच्च न्यायालयाने या तरतुदीनुसार संसदेमार्फत केली गेलेली घटनादुरुस्ती हा देखील कायदा मानून तो कलम १३(२) मधील कायद्याच्या व्याख्येत येतो असे स्पष्ट केले.

**५) २४ वी घटनादुरुस्ती (१९७१)**

या घटनादुरुस्तीद्वारे अशी तरतूद केली की, कलम ३६८ अन्वये संसदेला मूलभूत अधिकारांसह घटनेतील कोणत्याही भागाची दुरुस्ती करता येईल.

**६) २९ वी घटनादुरुस्ती**

या घटनादुरुस्तीने राज्याचे केवळ जमीन सुधारणा कायदे ९ व्या परिशिष्ठात समाविष्ठ करून त्यास पुनर्विलोकनाच्या अधिकारापासून संरक्षित केले. न्यायालयाने याबाबत स्पष्टीकरण केले की, 'घटनापीठा' मार्फत ९ व्या परिशिष्ठात समाविष्ठ केलेल्या बाबींचे पुनर्विलोकन होऊ शकते.

**७) केशवानंद भारती विरूद्ध केरळ राज्य खटला (१९७३)**

या खटल्यात न्यायालयाने संसदेचा घटनादुरुस्तीचा अधिकार मान्य केला मात्र 'घटनेच्या मूलभूत चौकटीची संज्ञा' सांगून संसदेच्या घटनादुरुस्तीच्या अधिकारावर मर्यादा आणली. या तत्वानुसार संसदेला मूलभूत अधिकारांसह घटनेच्या कोणत्याही भागात दुरुस्ती करता येते. मात्र त्याद्वारे घटनेची मूलभूत चौकट बदलता येणार नाही अथवा त्यात फेरफार करता येणार नाही.

अशा प्रकारे १९७३ साली पहिल्यादांच राज्यघटनेच्या मूलभूत चौकटीची संज्ञा उदयास आली. अर्थात या मूलभूत चौकटीच्या संज्ञेची वेगळी मांडणी सर्वोच्च न्यायालयाने घटनेत केलेली नसली तरी या खटल्यातील निर्णयांद्वारे मूलभूत चौकटीच्या संज्ञेमधील काही महत्वपूर्ण तत्वे स्पष्ट करण्याचा प्रयत्न केला आहे.

» संविधानाचे सर्वश्रेष्ठत्व
» भारतीय शासनाचे सार्वभौम, प्रजातांत्रिक, गणराज्याचे स्वरूप
» राज्यघटनेचे धर्मनिरपेक्ष स्वरूप
» कायदेमंडळ, कार्यकारी मंडळ व न्यायमंडळ यातील सत्ता विभाजन
» राज्यघटनेचे संघराज्यात्मक स्वरूप
» राष्ट्रीय एकता व अखंडता
» कल्याणकारी राज्य

» संसदीय व्यवस्था

» न्यायपालिकेचे स्वातंत्र्य

» न्यायालयीन पुनर्विलोकन

यानंतर मूलभूत चौकटीतील तत्वांबाबत विविध खटल्यांमधील निर्णयांद्वारे उलगडा झालेला दिसतो.

**१) इंदिरा गांधी विरूद्ध राजनारायण खटला (१९७५)**

या खटल्यात न्या. चंद्रचूड यांनी मूलभूत चौकटीतील दोन महत्वपूर्ण तत्वांचा उल्लेख केला.

» दर्जा व संधीची समानता

» कायद्याचे राज्य

**२) मिनर्वा मिल्स लिमिटेड विरूद्ध भारतीय संघराज्य खटला (१९८०)**

या खटल्यात न्या. चंद्रचूड यांनी तीन तत्वे स्पष्ट केली.

» संसदेचा घटनादुरुस्तीचा अधिकार

» न्यायालयीन पुनर्विलोकन

» मूलभूत हक्क व मार्गदर्शक तत्वे यातील समतोल

**३) सेंट्रल कोल फिल्ड्स लिमिटेड विरूद्ध जयस्वाल कोल लिमिटेड कंपनी खटला (१९८०)**

या न्यायाप्रती प्रभावी पोहोच याविषयी स्पष्टीकरण करण्यात आले.

**४) वामनराव विरूद्ध भारतीय संघराज्य खटला (१९८१)**

यात मूलभूत चौकटीचा पुनर्रच्चार करण्यात आला.

**५) एस.पी.संपतकुमार विरुद्ध भारतीय संघराज्य (१९८७)**

या खटल्यात दोन तत्वे स्पष्ट करण्यात आली.

» कायद्याचे राज्य

» न्यायालयीन पुनर्विलोकन

**६) किहोतो होलोहोन खटला (१९९३)**

यात लोकशाही व नियमित निवडणुका याविषयीचे स्पष्टीकरण करण्यात आले.

**७) एस.आर. बोम्मई विरुद्ध भारतीय संघराज्य खटला (१९९४)**

या खटल्यात न्यायमूर्ती सावंत आणि न्यायमूर्ती कुलदीप सिंह यांनी पुढील तत्वे सांगितली.

» लोकशाही

» संघराज्य

» धर्मनिरपेक्षता

**८) बाल मुकुंद साह विरूद्ध बिहार राज्य खटला (२०००)**

या खटल्यात दोन तत्वाचे स्पष्टीकरण देण्यात आले.

» कायदेमंडळ, कार्यकारी मंडळ व न्यायमंडळ यातील सत्ताविभाजन

» न्यायालयाचे स्वातंत्र्य

**९) आय.आर. कोहेलो विरुद्ध तामिळनाडू राज्य खटला (२००७)**

या खटल्यात ९ व्या परिशिष्टात समाविष्ठ केलेल्या बाबींचे पुनर्विलोकनाचा अधिकार सर्वसाधारण न्यायपीठालाही असेल असे सर्वोच्च न्यायालयाने स्पष्ट केले.

घटनात्मक मूलभूत चौकटीची संज्ञा न्यायालयाच्या निर्णयाद्वारे स्पष्ट करण्यात येत असली तरी घटनेतील प्रत्येक कलमाद्वारे ती प्रथम पासूनच अस्तित्वात असून ती नव्याने अंतर्भूत झालेली नाही.

## स्वाध्याय

**प्र. १) टिपा लिहा.**

» घटनादुरुस्तीच्या पद्धती

» घटनादुरुस्तीच्या मर्यादा

» ४४ वी घटनादुरुस्ती

» ८६ वी घटनादुरुस्ती

**प्र. २) खालील प्रश्नांची उत्तरे लिहा.**

» ४२ व्या घटनादुरुस्तीने केलेल्या तरतुदींची माहिती लिहा.

» 'राज्यघटनेची मूलभूत चौकट' याविषयी सविस्तर माहिती स्पष्ट करा.